## प्रस्तावना

प्रास्ताविक.......................................................................................... 2
संशोधनाची उद्दिष्टे.................................................................................. 3
संशोधन विषयाचे क्षेत्र आणि उपयुक्तता ..................................................... 4
संशोधन पद्धती .................................................................................... 5
1. ऐतिहासिक अभ्यास पद्धती ................................................................... 5
2. वर्णनात्मक पद्धती ............................................................................. 5
3. तौलनिक अभ्यास पद्धती ..................................................................... 5
गृहीतके.............................................................................................. 5
प्रबंधाची मांडणी ................................................................................... 6
समारोप .............................................................................................. 7

# प्रस्तावना

## प्रास्ताविक

मराठी साहित्यात त्याच्या प्रारंभापासून आजपर्यंत अनेक स्थित्यंतरे झालेली आहेत. साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक नवीन प्रवाह उदयास आल्याचे दुसून येतात त्याचप्रमाणे गोमंतकीय मराठी साहित्यातून प्रादेशिकता, ग्रामीणता, साहित्यातून दृगोच्चर होताना दिसतात. गोमंतक जरी महाराष्ट्राला जवळचाच प्रदेश असला तरी या छोट्याशा प्रदेशाला वेगळे, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय तसेच ऐतिहासिक परिमाण लाभले आहे. गोमंतकीय इतिहासात असलेल्या पोर्तुगीज राजवटीमुळे गोमंतकीय साहित्याची मुक्तीपूर्व व मुक्तीनंतरचे साहित्य अशी विभागणी केली जाते. १६ जानेवारी १९६७ रोजी झालेल्या जनमतकौलामुळे गोमंतकाचे महाराष्ट्रात विलीनीकरण न होता गोमंतक एक स्वतंत्र राज्य घोषित झालं आणि परिणामी गोमंतक प्रदेशाची विशिष्टता टिकवण्यास अधिकची भरही पडली. गोमंतकीय प्रदेशाचा वेगळेपणा, इथली कोंकणी भाषा, निसर्गसौंदर्य, समाज, जातीव्यवस्था, संस्कृती इत्यादीचे चित्रण भिन्न साहित्यप्रकारातून दिसते. कालपरत्वे निर्माण होणाऱ्या समस्या, बदलते समाजजीवन गोमंतकीय साहित्यातून प्रतिबिंबित होताना दिसते. कथा, कादंबरी, कविता, ललित लेख, असे वेगवेगळे प्रकार अगदी समर्थपणे हाताळलेले दिसतात. त्यात कथा या साहित्यप्रकाराने विपुल प्रमाणात गोमंतकीय मराठी साहित्यात भर घातलेली दिसते. अफाट वेगाने होणाऱ्या सामजिक स्थित्यंतरामुळे कथा आशयाच्या अंगानेही समृद्ध होताना दिसते, गोमंतकीय समाज, परंपरा यांचा वेध घेणारी कथा नव्वदोत्तरी टप्प्यात हरवलेली जीवनमूल्ये, आधुनिकीकरण, जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या, गोमंतकीय पारंपारिकतेला तडा देऊन डोकावणारे अनेक व्यवसाय, अनैतिक गोष्टी, सामाजिकतेचे एक वेगळे वास्तव पुढे आणताना दिसते. नव्वदोत्तरी कथेतील परिवर्तनाचा विचार करताना, बदलत्या समाजजीवनाचा वेध घेऊन, तसेच नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या स्वरूप वैशिष्ट्यांची चिकित्सा **'नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास'** या विषयाचा संशोधन प्रबंधांतर्गत अभ्यास केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. कथा या साहित्यप्रकारचे स्वरूप व व्याप्ती समजून घेत कथेच्या प्रारंभापासून कथा या साहित्यप्रकारात आशय अभिव्यक्तीच्या अनुषंगाने होणारा विकास समजून घेणे.
2. नव्वदपूर्व गोमंतकीय मराठी कथेचा नव्वदनंतरच्या गोमंतकीय मराठी कथेशी असलेले वेगळेपण जाणणे.
3. नव्वदनंतरच्या गोमंतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय बदलांचा परामर्श घेणे.
4. निवडलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथाकारांच्या आशयविश्वाचे स्वरूप पडताळणे.
5. निवडलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी लेखिकांच्या कथा लेखनाचे स्वरूप समजून घेणे.
6. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील प्रादेशिकता व ग्रामीणतेचे बदलते स्वरूप स्पष्ट करणे.
7. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर उमटलेले खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे पडसाद समजून घेणे.
8. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेवर असलेला मध्यवर्ती मराठी कथेचा प्रभाव स्पष्ट करणे.
9. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा मध्यवर्ती मराठी कथेशी असलेला वेगळेपणा समजून घेणे.
10. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथाकारांच्या शैली वैशिष्ट्यांचा विचार करणे.
11. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील पात्रे, निवेदन, वातावरण, संवाद, भाषा इ. घटकांच्या अनुषंगाने चिकित्सा करणे.

प्रस्तुत संशोधनात नव्वदोत्तरी टप्प्यातल्या १९९० ते २०२२ या कालखंडातील काही निवडक कथाकारांचा सखोल अभ्यास केलेला आहे. आधुनिकिकरण, जागतिकीकरणाचा प्रभाव व्यक्त करणारी, तसेच प्रादेशिकता व ग्रामीण जीवानातील सद्यस्थिती व्यक्त करणाऱ्या कथांची चिकित्सा केलेली आहे. यात नव्वदोत्तरी कालखंडातील महत्त्वाचे लेखक म्हणून विठ्ठल ठाकूर, पु. शि. नार्वेकर, गजानन रायकर, विठ्ठल गांवस, नारायण महाले, मिलिंद म्हामल, चंद्रकांत गांवस, ज्ञानेश्वर कोलवेकर, सु. म. तडकोड, उदय नाईक, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई यांच्या कथालेखनाबरोबर वासंती नाडकर्णी, माधवी देसाई, ज्योती कुंकळकर, मेघना कुरुंदवाडकर, डॉ. आरती दिनकर, अंजली अमोणकर, हेमा नायक, प्रतिभा कारंजकर, रेखा पौडवाल, सुजाता सिंगबाळ, गिरिजा मुरगोडी, रेखा मिरजकर या लेखिकांचा विचार या अभ्यासांतर्गत केला आहे.

**संशोधन विषयाचे क्षेत्र आणि उपयुक्तता**

मराठी साहित्यक्षेत्रात साठोत्तरी काळात अनेक प्रवाह निर्माण झाले. त्याचप्रमाणे 'नव्वदोत्तरी साहित्य' ही संकल्पना आज स्थिरावत असल्याने साहित्य व संशोधनाची एक नवी दिशा अभ्यासकांना खुणावत आहे. १९९० नंतर भारताच्या आर्थिक धोरणात झालेला बदल आणि त्यामुळे निर्माण झालेल्या खा-ऊ-जा संस्कृतीमुळे होणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर १९९० नंतरच्या कालखंडात साहित्यनिर्मिती होत 'नव्वदोत्तरी साहित्य' या संकल्पनेने जन्म घेतल्याचे आपल्याला दिसून येते. मध्यवर्ती मराठी साहित्यक्षेत्रात नव्वदोत्तरी साहित्य समृद्ध होत असताना गोमंतकीय साहित्यातही नव्वदोत्तरी कालखंडातील गोमंतकातील बदलांचे पडसाद दिसून येतात.

गोमंतकीय कथा लेखनाला समृद्ध अशी परंपरा लाभलेली आहे. डॉ. बालकृष्णाजी कानोळकर हे गोमंतकीय मराठी कथेचे महत्त्वाचे समीक्षक. डॉ. बाळकृष्णाजी कानोळकर यांनी गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास (आरंभ ते १९६१) खंड १ मध्ये आरंभापासून १९६१ पर्यंतच्या मुक्तीपूर्व कथांचा व कथालेखकांचा आढावा घेवून गोमंतकीय मराठी कथेच्या इतिहास लेखनामध्ये महत्त्वाची भर घातली. तत्कालीन सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी मांडून त्यांनी समीक्षात्मक दृष्टीने हा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे डॉ. कानोळकरांनी पीएच.डी. च्या अभ्यासासाठी प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या व्यापक कथाविश्वाचा तितक्याच व्यापकतेने अभ्यास करून गोमंतकीय मराठी कथा संशोधनामध्ये महत्त्वाची भर घातलेली दिसते. त्यांनी गोमंतक तसेच मराठी साहित्यातील काही महत्त्वाच्या कथालेखकांवर सातत्याने संशोधनपर लेख लिहून कथेच्या समीक्षेचा व्याप समर्थपणे हाताळलेला दिसतो. तसेच डॉ. सोमनाथ कोमरपंथ, डॉ. सु.म.तडकोडकर, डॉ. वासुदेव सावंत इ. समीक्षक व अभ्यासकांनी अनेक मासिकातून गोमंतकीय कथेवर समीक्षात्मक लेख लिहिलेले आपल्याला दिसून येतात. गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास झालेला असला तरी १९९० ते २०२२ या कालखंडातील सुरूवातीच्या पाच सहा वर्षातील कथालेखकांचा उल्लेख गोमंतकीय वाङ्मय इतिहासात आढळतो. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २ मधून, मुक्तीनंतरचा कालखंड व महत्त्वाच्या कथाकारांचा आढावा प्रा. नारायण महाले घेताना दिसतात. तसेच प्रा. विनय बापट यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर व प्रा. प्रमदा गावस देसाई यांनी नव्वदोत्तरी गोमंतकीय प्रादेशिक कथेवर शोधनिबंध लिहिलेले दिसून येतात. नव्वदोत्तरी कालखंड हा गोमंतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीयदृष्ट्या स्थित्यंतराचा

कालखंड असल्याने नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखन समृद्ध होत अनेक विषयांचा अंतर्भाव या कथेत होत असल्याने नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा आशय अभिव्यक्तीच्या अनुषंगाने अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**संशोधन पद्धती**

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचा अभ्यास करताना कथेचा आशयदृष्ट्या विचार करण्यासाठी गोव्याचा इतिहास समजून घेणे गरजेचे ठरते. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचे बदलते स्वरूप व वेगळेपणा समजून घेण्यासाठी खालील संशोधन पद्धतींचा वापर केलेला आहे.

**1. ऐतिहासिक अभ्यास पद्धती**

मुक्तिपूर्व गोमंतकीय कथेचा विचार करताना मुक्तिपूर्व गोव्याचा इतिहास व त्या काळाचे गोमंतकीय मराठी कथेवर उमटलेले पडसाद समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा समजून घेत असताना नव्वदोत्तरी गोमंतकात झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिवर्तनाचा विचार करताना, नव्वदोत्तर ही संकल्पना समजून घेत असताना ऐतिहासिक स्थित्यंतरांचा आढावा घेण्यासाठी ऐतिहासिक अभ्यास पद्धतीचा वापर केलेला आहे.

**2. वर्णनात्मक पद्धती**

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या आशयविश्वाची भिन्न अंगाने पडताळणी करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**3. तौलनिक अभ्यास पद्धती**

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा मध्यवर्ती मराठी कथेशी असलेला संबंध तसेच नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेची स्वतंत्र स्वरूप वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी तौलनिक अभ्यास पद्धतीचा आधार घेतलेला आहे.

**गृहीतके**

1. कथा या साहित्यप्रकारात आशय अभिव्यक्तीच्या अनुषंगाने विकास होताना दिसून येतो.

2. नव्वदपूर्व गोमंतकीय मराठी कथा व नव्वदनंतरची गोमंतकीय मराठी कथा यामध्ये आशयदृष्ट्या वेगळेपणा दिसून येतो.
3. नव्वदनंतरच्या गोमंतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय बदलांचे पडसाद नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर दिसून येतात.
4. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा लेखिका ग्रामीण स्त्री व तिच्या समस्या याचा विचार करताना दिसत नाहीत.
5. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारी प्रादेशिकता ही प्रादेशिक प्रश्नांतून व्यक्त होताना दिसून येते.
6. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनाशी निगडीत प्रश्न मांडणारी आहे.
7. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे पडसाद दिसून येतात.
8. कथेच्या प्रारंभकाळापासून मध्यवर्ती कथेशी समांतर जाणारी गोमंतकीय मराठी कथा नव्वदोत्तरी कालखंडात वेगळी वाट चोखाळताना दिसून येते.
9. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकार पूर्वसुरींच्या कथालेखनाला अनुसरून कथेचा घाट रचताना दिसून येतात.
10. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत कोंकणी भाषेतील भिन्न बोलीतील संवाद व वैशिष्ट्यपूर्ण अशा शब्दांचा, म्हणी, वाक्प्रचार इत्यादींचा वापर होताना दिसून येते.

**प्रबंधाची मांडणी**

“नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास (प्रातिनिधिक कथाकारांच्या कथांच्या अनुषंगाने)” या विषयातील सदर शोध प्रबंधाची मांडणी एकूण आठ प्रकरणांमध्ये पुढील प्रमाणे झालेली आहे. **कथा: संकल्पना, स्वरूप व व्याप्ती, १९९० पूर्व गोमंतकीय मराठी कथा, नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा, नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतील ग्रामीणता व प्रादेशिकता, नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण, मध्यवर्ती मराठी कथेचा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव, नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे वाङ्मयीन मूल्यमापन, उपसंहार आणि निष्कर्ष**

**समारोप**

प्रस्तुत संशोधन प्रबंधातून कथेचे स्वरूप समजून घेत, नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून येणारे विषयनाविन्य खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या अनुषंगाने अभ्यासले जाईल. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून दिसून येणारे ग्रामीणता व प्रादेशिकतेचे बदलते स्वरूप समजून घेतले जाईल. प्रारंभापासून मध्यवर्ती कथेशी समांतर जाणारी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा आशय व अभिव्यक्तीच्या अनुषंगाने स्वंतत्र होत गेली. या प्रक्रियेत काही बलस्थाने नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेला लाभली तसेच नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या काही मर्यादाही दिसून आल्या. या संशोधनाद्वारे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचे हे सर्व आयाम स्पष्ट होतील.